# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### पोलिसांच्या सेवा निवासस्थानांचा पुनर्विकास व नवीन सेवा निवासस्थानांचे बांधकाम करण्याबाबत

**(१) १२३०६ (१३-०९-२०२०). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस ठाणे व पोलीस वसाहती मधील सुविधांबाबत मा. गृह मंत्री, यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी पार पडलेल्या बैठकीत मा. गृह मंत्री यांनी पोलीस महासंचालक, म.रा. आणि पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना दुरुस्तीच्या पलिकडे असलेल्या पोलिसांच्या सेवा निवासस्थानांचा पुनर्विकास व नवीन सेवा निवासस्थानांचे बांधकाम ही कामे सिडको व म्हाडा यांसारख्या शासकीय संस्था आणि खाजगी विकासक यांच्यामार्फत अथवा त्यांच्याशी भागीदारीने करण्याबाबत धोरण ठरविण्यासाठी अभ्यास करुन याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबतचे निदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा. गृह मंत्री यांनी दिलेल्या निदेशानुसार याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालातील शिफारसींचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(४) असल्यास, सदरहू अहवालाच्या अनुषंगाने शासनाकडून या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०४-०३-२०२२) :**(१), (२), (३), (४) व (५) मुंबई पोलीस दलामध्ये पोलीस अधिकारी व अंमलदार यांना जास्तीत जास्त सेवानिवासस्थाने उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने दुरुस्तीच्या पलिकडे असलेल्या पोलिसांच्या सेवा निवासस्थानांचा पुनर्विकास व नवीन सेवा निवासस्थानांचे बांधकाम, याबाबत सर्वांगीण विचार करुन पोलीस विभागामार्फत शासनास सादर केलेल्या स्पष्ट धोरणात्मक शिफारशीचे स्वरुप व त्यानुसार शासनाकडून करण्यात येत असलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे.

* वाढती लोकसंख्या व त्यानुसार वाढणारे गुन्हयांचे प्रमाण लक्षात घेता, बृहन्मुंबई पोलीस दलाच्या वाढत्या मनुष्यबळाचा विचार करता अधिकाअधीक निवासस्थानांची आवश्यकता भासत असून त्या प्रमाणात मुंबईमध्ये पोलीस विभागाकडे असलेली जमीन कमी आहे. त्यामुळे असलेल्या जागेचे खाजगीकरण झाल्यास पोलीस विभागाची मालमत्ता संपुष्टात येईल.

* पोलीसांच्या सेवा निवासस्थानांचा पुनर्विकास व नवीन सेवा निवासस्थानांचे बांधकाम ही कामे सिडको व म्हाडा यासारख्या शासकीय संस्था किंवा खाजगी विकासक यांच्यामार्फत केल्यास ५०% पेक्षा जास्त घरे ही विक्रीसाठी उपलब्ध करावी लागतील, त्यामुळे पोलीसांना आवश्यक तेवढी शासकीय निवासस्थाने उपलब्ध होणार नाहीत.

* पोलीस विभागातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी अथवा जवळपास शासकीय निवासस्थान उपलब्ध झाल्यास ते त्वरीत कर्तव्याकरीता उपलब्ध व्हावेत, या कारणाकरीता पोलीस वसाहतींची स्थापना झालेली आहे. सार्वजनिक खाजगी भागीदारी प्रकल्प राबविल्यास पोलीसांची निवासस्थाने असणाऱ्या पोलीस वसाहतीच्या परिसरात खाजगी लोक रहायला आल्यास पोलीस वसाहतीची स्वायतत्ता नष्ट होऊन, ज्या उद्‌दिष्टांकरिता पोलीस वसाहतींची स्थापना झाली आहे ते संपुष्टात येईल.

* खाजगीकरणामुळे शासकीय निवासस्थानाव्यतिरिक्त विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या घरांकरीता पोलीसांकडूनही मालकी हक्कांच्या घरासाठी मागणी होईल. त्यामुळे बहुतांश पोलीसांना त्यांच्या मालकीची घरे मिळणार नाहीत व यासंदर्भात असंतोष निर्माण होवून न्यायालयात दावे दाखल होतील व पोलीसांमध्ये असंतोष / अराजक पसरेल.

* एकदा खाजगीकरणाची ही संकल्पना सुरु झाल्यास, भविष्यात ती थांबविणे अशक्य होईल. याकरिता पोलीस गृहनिर्माण महामंडळामार्फत शासकीय निधीतून पोलीसांच्या निवासस्थानाचे बांधकाम / पुनर्बांधणी करण्यात यावे, असे धोरण आहे. त्यानुसार दरवर्षी पोलीस गृहनिर्माण महामंडळाला शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. त्यामधून मुलुंड, मरोळ, गोरेगाव व सांताक्रुझ इ. ठिकाणी निवासस्थानांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

६) बृहन्मुबंई विकास योजना २०३४ अंतर्गत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमन (DCPR) २०३४ मधील विनियम क्र.३३,१७, १५,१४ मध्ये आवश्यक ते बदल करुन पोलीस सेवा निवासस्थानासाठी आरक्षण असलेल्या खाजगी जमीनीचा विकास, २००० चौ.मी. पेक्षा जास्त असलेल्या खाजगी जमीनीचा विकास, विशेष विकास क्षेत्रामधील जमीनीचा विकास, झोपडपट्‌टी पुनर्विकास, परवडणारी घरासाठी असलेल्या शासकीय/निमशासकीय जमीनीचा विकास करताना पोलीसांसाठी घरे बांधून देण्याबाबत शिफारशी केल्या आहेत. त्यानुसार विनियममध्ये बदल करणे सूचित केले आहे. त्यानुषंगाने तपासणीकरण्यात येत आहे.

---

**राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या प्रवेश शुल्कावर नियंत्रण आणण्याबाबत**

**(२) १३९४७ (१३-०९-२०२०). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी विशेषत: इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या प्रवेश शुल्कावर देखरेख नसल्याने अशा शाळांचे संचालक व व्यवस्थापक दर एक दोन वर्षांनी मोठ्या प्रमाणात फी वाढ करीत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्ले ग्रुप आणि नर्सरीचे शुल्कही मोठ्या शहरांमध्ये एक लाख रुपयांपर्यंत असल्याने पालक हवालदिल झालेले आहेत हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने शाळांची प्रवेश प्रक्रिया, त्याची शुल्क आकारणी यासाठी नियमावली तयार करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास यासंदर्भात नियमावली तयार झाली आहे काय तसेच अवाजवी प्रवेश शुल्क आकारणाऱ्या या शाळांच्या चालक व व्यवस्थापक यांच्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०२-०३-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) नाही.

(४) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियमातील तरतुदी नुसार कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात उभारण्यात आलेल्या लंच होमचा डोम कोसळल्याबाबत**

**(३) १८७१५ (२५-११-२०२०). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात (जि.औरगांबाद) येथे सुमारे ३ वर्षांपूर्वी १ कोटी ६७ लाख रुपये खर्च करून उभारण्यात आलेला लंच होमचा डोम कोसळला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लंच होमचे काम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्या अनुषंगाने निकृष्ट काम करण्याऱ्या ठेकेदार व संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०३-२०२२) :** (१) हे अशंत: खरे आहे.

लंच होमच्या वास्तुतील डाव्या बाजूचे Tensile roof sheet फाटून खाली पडले असुन, दुसऱ्या बाजूने डोम सुरक्षित आहे. सदर घटनेमध्ये कोणतीही मनुष्य हानी झालेली नाही. तसेच सदर डोमचा विमा काढण्यात आला होता. तथापि, शासकीय विमा कंपनीने विमा दाव्याचे सर्वेक्षण व मुल्य निर्धारण करण्याकरीता नेमलेल्या सर्वेक्षणाच्या अहवालानुसार शासकीय विमा कंपनीने विमा दावा ना-देय केलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे चिंचवड येथील एल्प्रो इंटरनॅशनल स्कूलमधील २००० विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण बंद केलेबाबत

**(४) २०३६८ (१८-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना कालावधीत पुणे चिंचवड येथील एल्प्रो इंटरनॅशनल स्कूल या शाळेने शुल्क न भरल्यामुळे सुमारे २००० विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळेविरोधात कोरोना काळात विद्यार्थ्यांची वाहतूक बंद असताना बसचे शुल्क भरण्याकरीता पालकांवर दबाव टाकण्यात येणे, वेळेत शुल्क न भरल्यास हजारो रुपयांचा दंड लावणे तसेच शुल्क न भरलेल्या २००० विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करण्यात आल्याच्या तक्रारी पालकांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ऑनलाईन शिक्षण बंद केल्याने मुलांचे मानसिक आरोग्य धोक्यात आल्याची तक्रार एल्प्रो परेंटस असोसिएशन मार्फत पालकांनी माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शिक्षण संचालक महानगरपालिका, शिक्षण अधिकारी व शासनाकडे केली असून इतर गैरप्रकाराबाबत शिक्षण विभागाकडे देखील तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने एल्प्रो इंटरनॅशनल स्कूल या शाळेची चौकशी करुन शाळेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०२-०३-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(४) होय.

(५) पिंपरी-चिचंवड महानगरपालिकेच्या त्रिसदस्यीय समितीने सदर शाळेची चौकशी करुन शाळेस नोटीस बजावली असता सदर नोटीसीची दखल घेवून कोणत्याही विद्यार्थ्याचे ऑनलाईन शिक्षण बंद केलेले नाही व कोणत्याही विद्यार्थ्याकडून दंड आकारलेला नाही तसेच आगाऊ घेतलेले परिवहन शुल्क परत करु, असे शाळेने पत्राद्वारे कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर विभागातील अनेक शाळांनी शिक्षकांचे वेतन अदा न केल्याबाबत**

**(५) २७३६९ (११-०६-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना महामारीच्या काळात शाळा बंद असताना शिक्षकांचे वेतन तात्काळ अदा करण्याबाबतचे आदेश दि. २९ एप्रिल, २०२१ रोजी वा त्या सुमारास शिक्षण उपसंचालकांनी नागपूर विभागातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा शिक्षकांचे वेतन देत नसल्याचे शिक्षणाधीकाऱ्यांना आढळून आल्यास त्या शाळांवर प्रशासकीय कार्यवाही करण्याचा प्रस्ताव शिक्षण उपसंचालकांकडे सादर करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर विभागातील अनेक इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील शिक्षकांचे वेतन कोरोना काळात बंद करण्यात आले असतानाही अद्यापपर्यंत यांपैकी एकाही शाळेवर प्रशासकीय कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधित शाळांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०२-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) विभागीय स्तरावर असे आढळून आलेले नाही. तसेच याबाबत तक्रारी प्राप्त नसल्याने कार्यवाही करण्यात आलेली नाही.

---

**राज्यातील वीसपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांबाबत शासन निर्णय निर्गमित केल्याबाबत**

**(६) २७६१२ (११-०६-२०२१). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीसपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांचे दुसऱ्या शाळेत समायोजन करण्याबाबत तसेच या विद्यार्थ्यांना प्रवास भत्ता आणि त्यांच्या प्रवासाची सोय करण्याबाबत शासनाने दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासन निर्णय निर्गमित केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन निर्णयामध्ये उल्लेखिल्यानुसार, ३ हजार ७३ वसतिस्थाने व त्यातील १६३३४ विद्यार्थी संख्या शासनाने निश्चित केली असली तरी प्रत्यक्षात १६ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांना दूरच्या शाळेत जाण्याची वेळ आल्याचे तसेंच तीन हजाराहून अधिक शाळा बंद केल्या जाणार असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षण हक्क कायद्यानुसार कमाल तीन किलोमीटरच्या परिघात विद्यार्थ्यांसाठी शाळा असणे आवश्यक असतांना ३०७३ वस्त्यांमधील विद्यार्थ्यांसाठी या परिघात शाळाच उपलब्ध नसल्यामुळे यापैकी अनेक विद्यार्थ्यांना जवळपास ३२ कि.मी.पर्यंतचा प्रवास करावा लागणार असल्याचेही निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०४-०३-२०२२) :** (१) अंशत : खरे आहे .
केंद्र पुरस्कृत समग्र शिक्षा योजनेप्रमाणे विद्यार्थ्यांना वाहतुक सुविधा उपलब्ध करण्यासाठी दि दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णय वीसपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा इतर शाळेत समायोजन करण्यासाठी नाही.
(२) सदर वस्तीस्थानांची संख्या व विद्यार्थी संख्या दिनांक २४ मार्च, २०२१ रोजीच्या शासन निर्णयात नमूद करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.
या विभागाच्या दिनांक २४ मार्च, २०२१ रोजीच्या शासन निर्णयासोबतच्या Annexure A मधील ८५ वस्तीस्थाने व Annexure B मधील २६ वस्तीस्थानांचे अंतर संगणकीय तांत्रिक दोषामुळे त्रुटीपूर्ण दर्शविण्यात आले होते व त्यामुळे विद्यार्थ्यांना जवळपास ३२ कि. मी. चा प्रवास करावा लागत असल्याचे दिसत होते. तथापि सदर शासन निर्णयास दिनांक ९ डिसेंबर, २०२१ रोजी शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले असून त्या अन्वये संगणकीय तांत्रिक चुकीची दुरूस्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### महर्षी विद्या मंदिर, बेला (ता. जि. भंडारा) या शाळेची मान्यता रद्द करण्याबाबत

**(७) २८२८० (११-०६-२०२१). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महर्षी विद्या मंदिर, बेला (ता. जि. भंडारा) शाळेच्या गैर व्यवस्थापन आणि लॉकडाऊन काळात विद्यार्थ्याने फी न भरल्याने परीक्षेपासुन वंचीत ठेवणे, जबरदस्तीने फी वसुली करणे, लोकप्रतिनिधीशी वाद घालणे व त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा शाळा व्यवस्थापनामार्फत दाखल करणे आदि कारणास्तव लोकप्रतिनिधीव्दारे शाळेची मान्यता रद्द करण्या संदर्भात शिक्षण मंत्री, यांना दिनांक ०६ जानेवारी, २०२१ रोजी निवेदनाव्दारे मागणी केली होती.

याअनुषंगाने विभागीय शिक्षण उपसंचालक नागपुर विभाग, नागपुर यांनी चौकशी अहवाल सादर केला असुन या चौकशी अहवालाची उपसंचालक स्तरावर तपासणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त अहवालाची तपासणी व चौकशी केली असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) असल्यास, चौकशी अहवालानुसार शाळेच्या प्रशासनावर शाळेची मान्यता रदद करुन दोषी व्यवस्थापनांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-०३-२०२२) :** (१), (२) व (३) महर्षी विद्या मंदिर, बेला (ता.जि.भंडारा) या शाळेच्या गैरव्यवस्थापनाबाबत शाळा व्यवस्थापनाविरुध्द लोकप्रतिनिधीद्वारे तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीचे अनुषंगाने शासनास अहवाल प्राप्त झाला होता. सदर प्रकरणी दि.१२/०८/२०२१ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीमध्ये महर्षि विद्या मंदिर, बेला या शाळेचे ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यासंदर्भात पुनश्च चौकशी करुन सविस्तर फेर चौकशी अहवाल सादर करावा अशा सूचना विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उरण (जि.रायगड) येथील मे.फिगोरिफिको अलाना प्रा.लि. कंपनीने नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीर कामे केल्याबाबत

**(८) ३२२१५ (११-०८-२०२१). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथील सिडकोच्या हद्दीतील मे.फिगोरिफिको अलाना प्रा.लि. कंपनीने जे.एन.पी.टी., उरण येथील प्लॉट क्रमांक २६ येथील कारखाना उभारणीस परवानगी मिळणेबाबत सिडको प्रशासन व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाकडे अर्ज सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कारखाना उभारणीस आवश्यक सिडको, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ तसेच अन्य शासकीय आस्थापनांची परवानगी / ना हरकत प्रमाणपत्र तसेच कोणतीही परवानगी मिळाली नसल्याचे निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कारखाना उभारण्याची जागा पाणथळ असून या जागेवर अनधिकृतरित्या भराव घालून १ लाख मेट्रीक टन रसायन साठवून ठेवतील इतक्या क्षमतेचे जवळपास १० ते १५ टँक उभारण्यात आले असून त्याकरिता सिडको प्रशासनाकडून अग्निसुरक्षा विभागाचे कोणतेही ना हरकत प्रमाणपत्र अथवा परवानगी घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त पाणथळ जागेवर बेकायदेशीरित्या भराव करताना या जागेवरील मँगरोज व दुर्मिळ अशा वनसंपतीचे नष्ट करण्यात आली असून सदरहू भराव करताना जिल्हाधिकारी, रायगड तसेच वन विभागाच्या मँगरोज कक्ष यांची कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त कारखान्यास परवानगी देताना, राज्यातील पाणथळ जागा व कांदळवनांची पाहणी करून त्यांचे जतन व संवर्धन करण्याकरीता मा.मुंबई उच्च न्यायालयाने स्थापित केलेल्या समितीची संमती शासनाने घेतली आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कंपनी विरूध्द कोणती कायदेशीर व दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे, असल्यास त्याचा तपशील काय आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (०२-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्नाधीन जागा सीआरझेड अंतर्गत तसेच पाणथळ क्षेत्रात येत नसल्याने याबाबत मा. उच्च न्यायालयाने स्थापित केलेल्या समितीची संमती संबंधित कंपनीने घेतली नसल्याचे जिल्हाधिकारी, रायगड यांनी कळविले आहे.
(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्रातील खाजगी शाळांचे शुल्क न भरल्याने विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण बंद केल्याबाबत**

**(९) ३२३६५ (११-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील फुरसुंगी आणि शिवणे येथील वॉलनट शाळेतील विद्यार्थ्यांचे ऑनलाईन पद्धतीने शिक्षण चालू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वॉलनट शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी शैक्षणिक शुल्क भरले नसल्याने या शाळेच्या फुरसुंगी आणि शिवणे शाखेच्या प्रशासनाने विद्यार्थ्यांचे दाखले सन २०२० मध्ये घरी पाठवून ऑनलाईन शिक्षणही बंद केल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, तसेच पिंपरी-चिंचवड मनपा क्षेत्रातील एल्प्रो इंटरनॅशनल स्कूल व इतर इंग्रजी माध्यम खाजगी शाळांचे शुल्क न भरल्याने विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण बंद केल्याच्या अनेक तक्रारी शिक्षण विभागाकडे पालकांनी केल्या आहेत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांनी शालेय शिक्षण विभागाच्या कार्यालयात अनेक तक्रारी करूनही त्याबाबत कोणतीही कारवाई न केल्याने पालकांनी संपूर्ण पुराव्यासह राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोगाकडे तक्रार केली होती, हे खरे आहे काय,
(५) असल्यास सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईचा अहवाल २० दिवसांत आयोगाकडे पाठविण्याबाबतचे आदेश राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोगाच्या अध्यक्षांनी शिक्षण उपसंचालक यांना माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान केले आहेत, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (०२-०३-२०२२) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) अंशत: खरे आहे.

(५) होय.

(६) या बाबत क्षेत्रीय कार्यालयामार्फत चौकशी करुन तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे. तसेच फी/थकीत थी भरली नाही म्हणुन कोणत्याही विद्यार्थ्याला शिक्षणापासुन वंचीत ठेवू नये. अशा सुचना दि. १२/८/२०२१ च्या शासन निर्णयान्वये सर्व शाळांना देण्यात आल्या आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पदवीधर अंशकालीन उमेदवारांची कंत्राटी तत्वावर नेमणूक करण्याबाबत

**(१०) ३२७२८ (१२-०१-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पदवीधर अंशकालीन उमेदवारांची कंत्राटी तत्वावर नेमणूक करण्याबाबत दिनांक ११ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास मंत्रीमंडळाच्या झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(२) असल्यास, एकुण किती जणांच्या नेमणूका करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (२८-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

या अनुषंगाने विभागाने शासन परिपत्रक क्रमांक कोविड-२०१८/प्र.क्र.५४ (भाग-३)/रोस्वरो-१, दिनांक २ मार्च, २०१९ निर्गमित करण्यात आलेला आहे.

(२) शासन निर्णयानुसार एकूण १८११ एवढया पदवीधर अंशकालीन उमेदवारांना नोकरी प्राप्त झाल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शिक्षण मंडळ विभागाच्या दहावी व बारावीच्या परिक्षाबाबत**

**(११) ३२७४० (१२-०१-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण मंडळ विभागाचे दहावी व बारावी च्या विद्यार्थ्यांच्या परिक्षाबाबत नियोजन अथवा सुचना न केल्यामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षक वर्गात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाच्या काळात सन २०२० या वर्षात दहावी व बारावी च्या परिक्षा न झाल्यामुळे विद्यार्थ्यांना मागील शैक्षणिक वर्षातील गुणांच्या आधारे गुणदान करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण मंडळ जुन्या पद्धतीनेच परिक्षा घेणार असल्यास शाळांना मार्गदर्शन करून लेखी परिक्षेचे नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०२-०३-२०२२) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षांचे आयोजन प्रचलित पध्दतीने करण्याबाबत राज्यमंडळाकडून जून, २०२१ पासून पूर्वतयारी सुरु करण्यात आली आहे. त्यानुसार राज्य मंडळामार्फत इ.१० व इ.१२ वी च्या परीक्षा प्रचलित पध्दतीने मार्च-एप्रिल २०२२ मध्ये आयोजित करण्यात येणार आहेत.

इ.१० वी व इ.१२ वी च्या विदयार्थ्यांचे वर्षभर विषयनिहाय मूल्यमापन करण्याबाबतच्या सूचना व तपशील राज्यमंडळाकडून यापूर्वीच शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) उपनिबंधक कार्यालयात जमिन खरेदी व विक्री व्यवहारात नागरिक व शेतक-यांकडून अतिरिक्त पैशांची मागणी होत असल्याबाबत**

**(१२) ३२७४५ (०७-०१-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) उपनिबंधक कार्यालयातील सदनिका तसेच जमिन खरेदी व विक्री व्यवहारात नागरिक व शेतक-यांकडून भरमसाठ पैशाची मागणी करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यालयात दलालांमार्फत खरेदी विक्रीच्या कामा व्यक्तिरिक्त इतर कागदपत्रे व स्टॅम्प पेपरच्या नावाने विनाकारण पैशाची मागणी करीत असल्यामुळे नागरिक व शेतक-यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कार्यालयात दलालांमार्फत सदनिका व जमिनी खरेदी विक्रीसाठी गेल्यावर काम तातडीने होते परंतु दलालांव्यतिरिक्त कामांसाठी गेलेले नागरिक व शेतक-यांना तासंतास रांगेत उभे रहावे लागत असुन दलालांमार्फत आलेले बिल्डर व उद्योगपती, गुणवत्तादार यांना प्रथम प्राधान्य दिले जाते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पनवेल उपनिबंधक कार्यालयातील सदनिका तसेच जमिनी खरेदी व विक्रीसाठी आलेल्या नागरिक व शेतक-यांना शासकीय फी आकारून तातडीने काम करून देण्याबाबत तसेच उक्त कार्यालय दलालविरहीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२८-०२-२०२२) :** (१),(२) व (३) हे खरे नाही.

पनवेलमधील दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये दस्त नोंदणीसाठी दलाल नाहीत. दलालांकडून होणारी भरमसाठ पैशाची मागणी ही बाब या विभागाच्या अखत्यारीत नाही. त्यामुळे खरेदी-विक्री दस्त नोंदणीच्या कामाव्यतिरिक्त इतर कागदपत्रे व स्टँम्प पेपरच्या नावाने पैशाची मागणी होण्याचा प्रश्न उदभवत नाही.

दुय्यम निबंधक कार्यालयात दस्तऐवज नोंदणी करण्याकरिता दलाल / एजंट /वकील/त्रयस्थ व्यक्ती यांची आवश्यकता नाही. तसेच तशी तरतूदही नोंदणी अधिनियम १९०८ व नोंदणी नियम १९६१ मध्ये नाही.

नोंदणी व मुद्रांक विभागाने सन २०१२ मध्ये आय-सरिता संगणक ऑनलाईन कार्यप्रणाली विकसित केली असून विभागाचे अधिकृत संकेतस्थळ (www.igrmaharshtra.gov.in) येथे ई-स्टेप-इन प्रणालीमध्ये लॉग इन करुन त्यांना नोंदणी करावयाच्या दस्तासाठी आवश्यक दिनांक व वेळ आरक्षित करता येते. अशा आरक्षित केलेल्या दिनांक व वेळेनुसार दस्तऐवजाची यथोचितरित्या नोंदणी केली जाते. ज्या पक्षकारांना ई-स्टेप-इन प्रणालीदवारे दिनांक व वेळ आरक्षित करता येत नाही, त्यांना कार्यालयामध्ये येवून दस्त दाखल करुन टोकन रजिस्टरमध्ये नोंद घेवून "प्रथम येणाऱ्यास प्राधान्य" या तत्वावर नोंदणीची प्रक्रिया पूर्ण केली जाते. त्यामुळे दलालामार्फत आलेल्या बिल्डर व उदयोगपती, गुणवत्तादार यांना प्रथम प्राधान्य देण्याचा प्रश्न उदभवत नाही.
(४) सध्याच्या कालावधी हा कोरोना महामारीचा असल्याने, नोंदणी कार्यालयात दस्त नोंदणीसाठी सादर करतेवेळी दस्त निष्पादन करणारी व्यक्ती व दस्तातील साक्षीदार यांनाच कार्यालयात प्रवेश दिला जातो. या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस कार्यालयात प्रवेश दिला जात नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एच.बी.टी. कला, वाणिज्य महाविद्यालय नागपूर येथील सहाय्यक प्राध्यापकांच्या नियुक्त्या संदर्भात गठीत केलेल्या समितीच्या अहवालाबाबत**

**(१३) ३२८७६ (१२-०१-२०२२). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मधील न्यु सुभेदार ले-आऊट येथील एच.बी.टी. कला/वाणिज्य महाविद्यालयात सन १९९१ ते १९९५ या कालावधीत बेकायदेशीररीत्या नियमाचे उल्लंघन करून सहाय्यक प्राध्यापकाच्या नियुक्या संदर्भात विद्यापीठाकडून चौकशी समिती गठीत करण्यात आली असून चौकशी समितीकडून सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी गठीत केलेल्या समितीने आपला अहवाल सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालानुसार नियमबाहय नियुक्या करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर व दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०४-०३-२०२२) :** (१) व (२) नाही. चौकशी समितीकडून सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली नसून चौकशी समितीने आपला अहवाल सादर केलेला नाही.

(३) चौकशी समितीचा अहवाल प्राप्त नसल्याने सद्यस्थितीत कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील पदवीधर अंशकालीन कर्मचा-यांना कंत्राटी पध्दतीवर थेट नियुक्त्या देण्याबाबत**

**(१४) ३२९४१ (१२-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने पदवीधर अंशकालीन कर्मचा-यांना बाहय यंत्रणेमार्फत आस्थापनेवरील कंत्राटी पध्द्तीवर थेट नियुक्त्या देण्याचे परिपत्रक दिनांक २ मार्च, २०१९ रोजी काढलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मात्र नांदेड जिल्हयात या परिपत्रकाची अंमलबजावणी कागदोपत्री असून येथे १ हजार ९०० अंशकालीन कर्मचारी, नियुक्तीच्या प्रतिक्षेत असल्याचे दिनांक ३ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने माहिती घेवून या अंशकालीन कर्मचाऱ्यांना तातडीने नियुक्त्या देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (२८-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, अंशत: खरे आहे.
नांदेड जिल्हयात पदवीधर अंशकालीन म्हणून उमेदवारांचा नोंदणीपट १ हजार ९४० आहे.
(३) कंत्राटी पध्दतीवर थेट नियुक्त्याबाबत शासन परिपत्रक दि.०२ मार्च, २०१९ रोजी काढलेले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, नांदेड यांचे अध्यक्षतेखाली दि.२०/०८/२०१९, दि.०६/०६/२०२१ व दि.२६/०७/२०२१ रोजी बैठका घेण्यात आल्या. सर्व खातेप्रमुखांना /आस्थाप्रमुखांना दि.२४/११/२०२१ च्या पत्रान्वये सूचना दिल्या.
सा.प्र.वि.शा.नि.क्रपअंक-१००९ /प्र.क्र.२००/१६अ,दि.२७.१०.२००९ अन्वये १०% सुशिक्षित बेरोजगारांना (एकूण २५) समांतर आरक्षणानुसार नियुक्ती मिळाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अल्पसंख्याक नव उद्योजकांचे भवितव्य धोक्यात आल्याबाबत**

**(१५) ३२९५४ (१२-०१-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अल्पसंख्याक समाजातील महिला आणि तरुण उद्योजकांना मौलाना आझाद महामंडळाकडून मागील चार वर्षात थेट कर्ज, सुक्ष्म पतपुरवठा वाटप झाला नसल्याचे दिनांक ०६ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनांची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (०४-०३-२०२२) :** (१) व (२) मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत थेट कर्ज योजना, मुदत कर्ज योजना व सुक्ष्म पतपुरवठा योजनेअंतर्गत व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करुन देण्यात येत होते. थेट कर्ज योजनेअंतर्गत सन २०००-०१ ते २०१६-१७ या कालावधीमध्ये ४३४१२ लाभार्थ्यांना रु.१५८.५३ कोटी इतक्या कर्जाचे वाटप करण्यात आलेले आहे.

दिनांक २१ जून, २०१७ च्या पत्रान्वये शासनाने थेट कर्ज योजनेखाली प्राप्त होणाऱ्या अर्जांना राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या मुदत कर्ज योजनेअंतर्गत लाभ देण्याचा व मालमत्ता तारण आहे अशानाच कर्ज मंजूर करण्याचा निर्णय घेतलेला होता. त्यानुसार मुदत कर्ज योजनेअंतर्गत सन २०१९-२० मध्ये ३६ अर्जदारांना रु. ३३.५६ लाख इतकी रक्कम वितरित करण्यात आलेली आहे. मुदत कर्ज योजना सुधारित स्वरुपात राबविण्याबाबत शासन स्तरावर विचार सुरु आहे.

तसेच महामंडळामार्फत राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने राबविण्यात येणारी सुक्ष्म पतपुरवठा योजना सुधारित स्वरुपात राबविण्याबाबत शासन मान्यता देण्यात आली असून सदर योजनेअंतर्गत जाहीरात देवून अर्ज मागविण्यात आले आहेत. माहे जून, २०२१ ते ऑक्टोबर, २०२१ या कालावधीमध्ये सदर योजनेअंतर्गत ५७२ इतके अर्ज प्राप्त झाले असून प्रति अर्ज रु. १.९० लाखाप्रमाणे सुमारे रु. १०.८७ कोटी इतकी रक्कम वितरित करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जेष्ठ नागरिकांसाठी हाहिर केलेल्या शरद गतम या योजनेबाबत**

**(१६) ३२९७१ (१२-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जेष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी व उपाययोजनाच्या दुष्टीने शासनाने शरद गतम ही योजना जाहिर केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेची कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी नेमण्यात आलेल्या राज्यपातळीवरील समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू योजनेच्या अहवालावर त्वरीत कार्यवाही करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०२-०३-२०२२) :** (१) होय,

(२) होय,

(३) सदर योजना मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही,

---

**मुरबाड तालुक्यात (जि.ठाणे) येथे होत असलेला स्टॅम्पपेपरचा काळा बाजार**

**(१७) ३३१०८ (०७-०१-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धसईबाजार पेठ, टोकावडे, म्हसा, सरळगांव (ता.मुरबाड, जि.ठाणे) हया गावांमध्ये महा-ई सेवा/सायबर/आपले सरकार/सेतू केंद्र ते स्टॅम्प पेपर विक्रेते हे मोठ्या प्रमाणात स्टॅम्प पेपरचा काळाबाजार करीत असल्याच्या अनेक तक्रारी तहसिलदार कार्यालय, मुरबाड कार्यालयात केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे पंचायत समितीचे माजी सदस्य यांनी दुय्यम निबंधक व महसुल कार्यालय, मुरबाड यांच्याकडे उक्त प्रकरणी कार्यवाही करण्याबाबत दिनांक ४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार काळाबाजार करणाऱ्या संबंधित दोषीविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२८-०२-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोलवी, (ता.पेण, जि. रायगड) यथील जे.एस.डब्ल्यू. कंपनीतील परप्रांतिय कामगारांच्या भरतीबाबत**

**(१८) ३३११० (१२-०१-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेण तालुक्यातील वडखळ जवळील डोलवी गावातील जे.एस.डब्ल्यू. या पोलादनिर्मिती करणाऱ्या कंपनीत भूमिपूत्रांना डावलून ४० हजार परप्रांतिय कामगारांची भरती करण्यात आल्याची घटना दिनांक ८ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी भूमिपुत्रांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (२५-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही. यासंदर्भात प्राप्त अहवालानुसार, जे. एस. डब्ल्यू. कंपनीच्या स्थानिक लोक रोजगार फ़ॉर्म-१ मध्ये एकूण ३९८९ (पर्यवेक्षकीय श्रेणीमध्ये-१८६८ (५१.९८%) व इतर श्रेणीमध्ये-२१२१(८०.६७%) इतकी स्थानिक कर्मचा-यांची रोजगार संख्या असल्याचे दिसून येते.तसेच, कामगारांच्या भरती मोहिमेंतर्गत जाहिरातीं मध्ये तसेच कॅम्पस निवडीमध्ये सर्वांना समान हक्क असल्याने, जे. एस. डब्ल्यू. कंपनी स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देत आहे, असेही कंपनीने लेखी दिले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धरणगांव, जि. जळगांव येथील प्राचार्यांबाबत दाखल झालेल्या तक्रारीबांबत**

**(१९) ३३३२२ (१२-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगांव, जि. जळगांव येथील प्राचार्य

डॉ.टी.एस. बिराजदार यांनी केलेल्या अन्याय व शोषणासंदर्भात माहे जून, २०१८ रोजी वा त्या सुमारास व्यवस्थापन मंडळ यांच्याकडे डॉ. प्रविण समाधान बोरसे, सहा.प्राध्यापक यांनी तक्रार करण्यात आल्यानुसार सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव यांनी मा.कुलसचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव, यांना माहे फेब्रुवारी, २०२० वा त्या दरम्यान व माहे एप्रिल, २०२१ मध्ये चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय तसेच चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगांव, जि. जळगांव येथील प्राचार्य डॉ.टी.एस. बिराजदार यांचे संदर्भात दाखल तक्रारीच्या अनुषंगाने विद्यापीठाने चौकशी समिती गठीत केली होती, सदर समितीने आपला गोपनीय अहवाल दि.१८.१०.२०२१ रोजी मा. कुलगुरु महोदयांकडे सादर केला असून मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशानुसार सदर अहवाल मा. व्यवस्थापन परिषदेच्या पुढील सभेवेळी सादर करण्यात येणार असल्याचे विद्यापीठाने दिनांक १८.११.२०२१ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) कार्यवाही सुरु असल्याने विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर विभागातील राज्य परिवहन महामंडळाची परिक्षा उत्तीर्ण झालेल्या खुल्या वर्गातील उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत**

**(२०) ३३३२५ (१२-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर विभागात सन २०१६-१७ मध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने घेतलेल्या भरती प्रक्रियेत नियमानुसार परिक्षा पास होऊन ड्रायव्हर टेस्ट, भोसरी रिटेस्ट पास, इच्छा पत्र व इतर प्रक्रिया पार पाडलेल्या खुल्या वर्गातील उमेदवारांना तात्काळ सेवेत सामावून घेण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.परिवहन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना माहे ऑक्टोबर, २०२० पासून वारंवार निवेदन देऊनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने खुल्या वर्गातील उमेदवारांना तात्काळ सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली, त्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०२-०३-२०२२) :** (१) सदरबाबत मा.लोकप्रतिनिधी यांचे दि.१७.०२.२०२१ रोजीचे निवेदन प्राप्त असून, सरळसेवा भरती सन २०१६-१७ अंतर्गत चालक तथा वाहक पदातील राज्य परिवहन महामंडळाच्या पालघर विभागाच्या अतिरिक्त यादीवरील खुल्या

प्रवर्गातील २४ व निवड आणि अतिरिक्त यादीत समाविष्ट नसलेले परंतू संगणकीकृत वाहन चालन चाचणी उत्तीर्ण ३६ असे एकूण खुल्या प्रवर्गातील ६० उमेदवारांपैकी मुंबई प्रदेशातील अन्य विभागात काम करण्यास इच्छूक असलेल्या अतिरिक्त यादीतील २१ उमेदवारांना रिक्त जागेनुसार राज्य परिवहन सिंधुदूर्ग विभागात नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.

(२) कोवीड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे राज्यात करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे राज्य परिवहन महामंडळाची प्रवासी वाहतूक अंशत: सुरु होती. त्यामुळे, कमी नियते चालनात असल्याने, मनुष्यबळाचा कमीत कमी वापर असल्याने, नियमित कर्मचा-यांना देखील कामगिरी देणे शक्य होत नसल्यामुळे, कर्मचारी अतिरिक्त होत आहेत. राज्य परिवहन महामंडळाचे उत्पन्न कमी झाले असल्यामुळे, आर्थिक काटकसरीच्या अनुषंगाने उपाययोजना करण्याच्या दृष्टीने सरळसेवा भरती सन २०१६-१७ व २०१९ अंतर्गत चालक तथा वाहक भरती प्रक्रियेची कार्यवाही आहे, त्या टप्प्यावर स्थगित ठेवण्याबाबत निर्णय झाला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुंभारमाट (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथे शासकीय डी.फार्मसी व बी.फार्मसी महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(२१) ३३५७८ (१२-०१-२०२२). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय तंत्रनिकेतन, कुंभारमाट (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथे शासकीय डी.फार्मसी व बी.फार्मसी महाविद्यालय सुरु करण्याची बाब तपासून सविस्तर अहवाल तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत तयार करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना रत्नागिरी, कोल्हापूर, गोवा, मुंबई व पुणे या भागात प्रवेश घेण्यासाठी होणारा त्रास व अडचणी लक्षात घेता व आर्थिकदृष्टया विद्यार्थ्यांना परवडत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत लागणारी जमीन संपादन करण्यात आली आहे काय तसेच एकुण किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीत काय आढळून आले व त्या अनुंषगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (२५-०२-२०२२) :** (१), (२) व (३) तंत्रशिक्षण संचालनालयाने दिनांक १६ फेब्रुवारी, २०२२ रोजीचे पत्राव्दारे सिंधुदूर्ग जिल्ह्यात शासकीय तंत्रनिकेतन, मालवण परिसरात शासकीय डी.फार्मसी व बी.फार्मसी महाविद्यालय सुरु करणेबाबतचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) शासन मान्यतेस्तव सादर केलेला आहे. त्यास अनुसरुन शासन स्तरावरुन पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रस्तावित शासकीय डी.फार्मसी व बी. फार्मसी. महाविद्यालय हे शासकीय तंत्रनिकेतन, कुंभारमाट (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या संस्थेच्या आवारात उपलब्ध असलेल्या शासनाच्या मालकीच्या जागेवर सुरु करण्याचे प्रस्तावित असल्याने जमिनीबाबत कोणताही आर्थिक भार येणार नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्राथमिक शिक्षकांच्या परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजने (डिसीपीएस) अंतर्गत येणाऱ्या रक्कमेबाबत**

**(२२) ३३७०३ (१२-०१-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्राथमिक शिक्षकांची परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजने (डिसीपीएस) अंतर्गत कपात झालेली रक्कम संबंधित जिल्हा परिषदेस वळती करण्याकरिता लेखाशिर्ष व अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी बल्लारपूर, यांनी प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मुंबई यांना दिनांक २७ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या दरम्यान लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०४-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे
(२) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेतंर्गत नवीन लेखाशिर्ष उघडणेबाबत दि.१८/०२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये आणि परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या अंशदानाच्या रकमा प्रदान करण्याबाबतची कार्यपध्दती दि.२०/१२/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली असून विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांना दि.१३/१०/२०२१ रोजी उचित कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तुळजापूर (जि. उस्मानाबाद) तालुक्यामधील पशुवैद्यकीय दवाखान्याची श्रेणी वाढ करण्याबाबत**

**(२३) ३३७१८ (०७-०१-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर (जि. उस्मानाबाद) तालुक्याचे क्षेत्रफळ मोठे असुन तेथील गावांमध्ये मोठ्या प्रमाणात वाडया व वस्ती विरळ स्वरुपात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुळजापूर तालुक्यामधील पशुधनाची संख्या मोठया प्रमाणात असल्यामुळे मौजे आरळी (बु.), सलगरा (म.), सलगरा (दि.) या गावांमधील पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या दर्जामध्ये वाढ करुन त्याचे रुपांतर पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ मध्ये करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्ताव प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरहू प्रस्तावास मान्यता देवून तेथील पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या दर्जामध्ये वाढ करुन त्यांचे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ मध्ये रुपांतर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (०२-०३-२०२२) :** (१),(२),(३) व (४) तुळजापूर तालुक्यात एकूण १२३ गावे असून २० व्या पशुगणनेनुसार एकूण पशुधन संख्या २,४२,०५४ इतकी असून ८१,९०३ एवढे पशुधन घटक आहेत. तूळजापूर तालुक्यात सद्य:स्थितीत तालुका लघुपशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय ०१, पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ चे ०६ व पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ चे १२ अशा एकूण १९ पशुवैद्यकीय संस्था कार्यरत आहेत.

आयुक्त पशुसंवर्धन, पुणे कार्यालयाकडुन प्राप्त असलेल्या एकूण ४२८ पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या दर्जावाढीच्या प्रस्तावांमध्ये तुळजापूर तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी - २ मौजे आरळी (बु.) सलगर (म.), सलगर (दि). या पशुवैद्यकीय दवाखान्यांचा समावेश आहे.

उपरोक्त दवाखान्यांच्या दर्जावाढीचा प्रस्ताव वित्त विभागास सादर केला असता, वित्त विभागाने पशुसंवर्धन विभागाचा सुधारीत आकृतीबंध मंजूर करून घेण्याबाबत प्रथम कार्यवाही करावी, असे अभिप्राय दिले आहेत. त्यानुषंगाने पशुसंवर्धन विभागाचा सुधारीत आकृतीबंध अंतिम करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील दुय्यम निबंधक कार्यालयात महारेरा नियमांचे उल्लंघन केल्याबाबत

**(२४) ३३८९३ (१०-०१-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील दुय्यम निबंधक कार्यालयात नियमबाह्य़ जमिनींची मोठ्या प्रमाणात दस्त नोंदणी केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तुकडा बंदी कायदा असताना महारेराच्या नियमांचे उल्लंघन करून तुकडा बंदी असताना हजारो दस्तांची नोंदणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन नियमांचे उल्लंघन करुन दस्त नोंदणी करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२८-०२-२०२२) : (**१) व (२) होय. हे खरे आहे.

पुणे शहरातील २७ दुय्यम निबंधक कार्यालयांच्या साधारण वर्षभराच्या कामकाजाच्या तपासणीमध्ये काही दस्तांमध्ये, तुकडेबंदी कायदयाचे उल्लंघन किंवा रेरा प्रमाणपत्राशिवाय नोंदणी झाली असल्याची बाब खरी आहे.

(३) शासनाने तपासणी पथक गठीत करुन तपासणी केली आहे व अनियमितांचे प्रमाण जास्त असलेल्या ४ दुय्यम निबंधक/प्रभारी दुय्यम निबंधक यांना निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्यात येत आहे.उर्वरित जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्याची प्रक्रीया शासन स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील मे. लॉयड मेटल्स कंपनीने वेकोलीच्या बंद असलेल्या ओपन कास्ट खदानीवर अतिक्रमण केल्याबाबत**

**(२५) ३३९४२ (१२-०१-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घुग्घुस (जि.चंद्रपूरर) येथील मे.लॉयड मेटल ॲन्ड एनर्जी लिमिटेड कंपनीद्वारे नकोडा जवळील वेकोलीच्या बंद पडलेल्या ओपन कास्ट खदानीवर अवैधरित्या अतिक्रमण करण्यात आले असल्याचे दिनांक १० मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंद पडलेल्या खदानीतील पाण्यामुळे येथील वन्यजीवांना धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील कंपनीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (२४-०२-२०२२) :** (१) घुग्गुस (जि.चंद्रपूर) येथील मे.लॉयड मेटल ॲण्ड एनर्जी लि. कंपनीद्वारे नकोडा गावाजवळील वेकोलीच्या बंद पडलेल्या ओपन कास्ट खदानीवर अवैधरित्या अतिक्रमण केले असल्याची बाब, दिनांक १० मार्च, २०२१ या दिनांकास अथवा त्यापूर्वी अथवा त्यानंतर निदर्शनास आलेली नाही.

यासंदर्भात महाप्रबंधक, वेकोली यांनीही, "सदरच्या खदानीवर कोणतेही अतिक्रमण नसल्याचे" दिनांक १३ मार्च, २०२२ च्या पत्राद्वारे जिल्हा प्रशासनाला कळविले आहे.

(२) बंद पडलेल्या विषयाधीन खाणीमधील पाण्यामुळे, वन्यजीवांना कोणताही धोका नसल्याची वस्तुस्थिती विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वन विभाग, चंद्रपूर यांनी जिल्हा प्रशासनाच्या

निदर्शनास आणून दिलेली आहे.

याशिवाय या खाणीतील पाण्याच्या नमुन्यांची नागपूर येथील पर्यावरण प्रयोगशाळेत करण्यात आलेल्या चाचणीनुसार, सदरचे पाणी सुरक्षित असल्याचे दिसून आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याचे जतन करुन सर्व सामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी उपाययोजना करणेबाबत.**

**(२६) ३४२१० (२३-११-२०२१). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषाचे साहित्य संपूर्ण जगात मार्गदर्शक असून सदर साहित्य विचारधन सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावे या हेतुने दिनांक १५ मार्च, १९७५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीची गेल्या ४४ वर्षांत केवळ २२ खंड व ३ सोअर्स मेटेरियल एवढीच कामगिरी राहिली असून २००६ पासून म्हणजे गेल्या १५ वर्षांपासून एकही नवीन खंड प्रकाशित झाला नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ च्या सुमारास समोर आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बाबासाहेबांच्या साहित्याला (खंडांना) प्रचंड मागणी असताना राज्य शासन व प्रकाशन समिती या खंडांच्या पुर्नमुद्रण आणि प्रकाशित मराठी खंडाचा इंग्रजी अनुवाद व इंग्रजी खंडाचा मराठी अनुवाद करण्यात अपयशी ठरल्याचे समजते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, गेल्या १६ वर्षांपासून खंडाच्या मराठी अनुवादाची मुद्रीत प्रकाशन समितीकडे मान्यतेसाठी प्रलंबित असून आजवर प्रकाशित झालेल्या एकही इंग्रजी खंडाचा मराठी अनुवाद झालेला नसल्याचे कळते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, भारत देशाचे संविधान निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याचे जतन करुन सर्व सामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासन काही ठोस उपाययोजना करणार आहे हे ही खरे आहे काय

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (२०-१२-२०२१) :** (१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीची स्थापना दिनांक १५ मार्च, १९७६ रोजी झाली आहे, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) इंग्रजी खंड क्र.६ चा मराठी अनुवाद प्रकाशित झाला असून इंग्रजी खंड क्र.१३ च्या (दोन भाग) मराठी अनुवाद लवकरच प्रकाशित होत आहे.

(५) हे खरे आहे.

(६) प्रश्नच उद्‌भवत नाही.

**नागपूर येथील मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मागील सात वर्षापासून संचालक मंडळापासून वंचित असल्याबाबत**

**(२७) ३४३१९ (१२-०१-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मागील सात वर्षापासून संचालक मंडळापासून वंचित असल्याचे दिनांक २८ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडाळाच्या स्वयंरोजगार, बचत गट व शैक्षणिक कर्ज वाटपाच्या योजनांचा गैरप्रकार झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संचालक मंडळाच्या सदस्यांचा रिक्त जागा भरण्यात येणार आहेत काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, तसेच चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (०४-०३-२०२२) :** (१) हे अंशत : खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदरची बाब शासन स्तरावर विचाराधींन आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहाराच्या रक्कमेबाबत**

**(२८) ३४३३९ (१२-०१-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील दोन लाख ९८ हजार ११३ विद्यार्थ्यांना माहे ऑगस्ट ते ऑक्टोबर, २०२१ पर्यंतचा पोषण आहार मिळाला नसल्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय पोषण आहारा ऐवजी बिस्किटचे वाटप देण्याचे संचालनालयाने ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जुन-जुलै महिन्यांतील ४० दिवसांच्या आहाराची थेट रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात वर्ग झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०२-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

तथापि, सद्यस्थितीत पोषण आहाराचे वाटप सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार जून- जुलै महिन्यामधील ४० दिवसांची आहार खर्चाची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात वर्ग न करता आहार खर्च मर्यादेत विद्यार्थ्यांना कोरडा शिधा देण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ पंचायत समितीच्या कार्यालयीन इमारतीमधील मोकळ्या खोलीत शिधावाटप कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(२९) ३४४३४ (१२-०१-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ पंचायत समितीच्या कार्यालयीन इमारतीमधील मोकळ्या खोलीत अंबरनाथ ४६ फ शिधावाटप कार्यालय सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ मे, २०२१ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी उपअभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती, अंबरनाथ यांना अभिप्रायांसह प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दि.०८ जून, २०२१ रोजी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२५-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी दि.०८.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अंबरनाथ व उप अभियंता, बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, अंबरनाथ यांना अभिप्रायासह प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

परंतु, उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, अंबरनाथ यांनी त्यापूर्वीच दि.०४.०६.२०२१ रोजी कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांना सादर केलेल्या अहवालात, आजमितीस पंचायत समिती कार्यालय इमारत पूर्णपणे नादुरुस्त झाली असल्याने धोकादायक अवस्थेत आहे, असे वरकरणी पहाणीवरुन वाटते. सदर इमारतीचे बांधकाम लोड बेअरिंग प्रकारचे सन १९७१ चे असून, सदर इमारतीच्या बांधकामास ५० वर्ष पूर्ण झाल्याने सदर इमारतीचे आर्युमान संपले आहे.

सदर पंचायत समिती कार्यालय इमारत शासकीय/ जिल्हा परिषद मालकीच्या असल्याने व जागा सरकार/ शासनाच्या नावे असल्याने, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अंबरनाथ यांनी याबाबत पुढील प्रस्ताव जिल्हा परिषद स्तरावरुन होणेबाबतची शिफारस केली आहे.
(४) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून अंबरनाथ व बदलापूर शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या जलकुंभाची सफाई करण्याबाबत

**(३०) ३४५९७ (१२-०१-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून अंबरनाथ व बदलापूर शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी उभारण्यात आलेल्या जलकुंभाची वर्षभरापासून सफाई झाली नसल्याने परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलकुंभ सफाईचे काम डीएसआरमधून वगळण्यात आल्याने अंबरनाथ व बदलापूर शहरातील जल शुध्दीकरण केंद्र व पंपींग स्टेशन येथील संप, उंच जलकुंभ, भुस्तर जलकुंभ, मुख्य संतुलन जलकुंभ यांची साफ सफाई मनुष्यबळाद्वारे करण्याच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०२१-२२ च्या दरसुचीवर आधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार कार्यवाही होऊन येथील सर्व जलकुंभांची साफ सफाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (११-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून अंबरनाथ व बदलापूर शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी उभारण्यात आलेल्या जलकुंभाची पावसाळयापूर्वी सफाई करण्यात आली आहे.
(२) व (३) होय. हे खरे आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१९-२० च्या दरसुचीमध्ये पाण्याचे जलकुंभ मशीनद्वारे साफसफाई करणे या कामाच्या बाबीचा दर अंतर्भुत होता. परंतु सन २०२१-२२ च्या दरसुचीमध्ये सदर बाबीचा दर वगळण्यात आलेला आहे. त्यामुळे अंबरनाथ व बदलापूर शहरातील जल शुध्दीकरण केंद्र व पंपींग स्टेशन येथील संप, उंच जलकुंभ, भुस्तर जलकुंभ, मुख्य संतुलन जलकुंभ यांची साफ सफाई मनुष्यबळाद्वारे करण्याच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०२१-२२ च्या दरसुचीवर आधारित अंदाजपत्रकास मंजूरी प्राप्त झाली असून, सदर कामाची निविदा प्रक्रिया चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) येथील मोटार अपघात नुकसान भरपाई प्राधिकरणाकडे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे अधिकार क्षेत्रातील प्रलंबित प्रकरणे हस्तांतरित करण्याबाबत**

**(३१) ३५०७३ (१२-०१-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) येथे स्थापन झालेल्या मोटार अपघात नुकसान भरपाई प्राधिकरणाकडे मलकापूर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे अधिकार क्षेत्रातील प्रलंबित प्रकरणी हस्तांतरित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९/०९/२०२० रोजी वा त्यासुमारास माननीय अपर मुख्य सचिव परिवहन यांना दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली, केलेल्या कार्यवाहीचे स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०२-०३-२०२२) :** (१) होय.

(२) गृह विभाग, अधिसूचना क्र.एमसीटी १०२०/ प्र.क्र.१००/परिवहन-५, दिनांक १२ नोव्हेंबर, २०२० अन्वये मलकापुर (जि.बुलढाणा) येथे मोटार अपघात दावा न्यायाधिकरण स्थापन करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वस्त धान्य दुकानदारांना नियमापेक्षा कमी धान्य मिळत असल्याबाबत**

**(३२) ३५१२७ (१२-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वस्त धान्य दुकानदारांनी त्यांना शासकीय गोदामातून पुरविण्यात येणा-या धान्य पोत्यांमध्ये ५० ऐवजी ४२ ते ४४ किलो धान्य देण्यात येत असल्याच्या तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीनूसार ज्येष्ठ समाजसेवक श्री. नंदकिशोर मुंदडा यांनी स्वतः पाहणी केली असता गोदाम रक्षक, अंबाजोगाई यांनी ही बाब मान्य केली असल्याचे निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नायब तहसिलदार (पुरवठा) व गोदाम रक्षक, शासकीय धान्य गोदाम, अंबाजोगाई यांच्याविरूध्द तहसिलदार, अंबाजोगाई यांनी सुधारीत दोषारोपपत्र/ जोडपत्र ०१ ते ०४ दिनांक २२ नोव्हेंबर, २०२१ अन्वये जिल्हा पुरवठा अधिकारी, कार्यालय, बीड यांना सादर केलेले आहेत. सदरचे दोषारोपपत्र जिल्हाधिकारी, बीड यांना सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधित दोषींवरील कार्यवाही पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०८-०३-२०२२) :** (१) शासकीय गोदाम रक्षक, अंबाजोगाई यांनी गोदामातुन पोत्यांमध्ये ५० ऐवजी ४२ ते ४४ किलो धान्य दिले असल्याचे रास्तभाव धान्य दुकानदारांची लेखी तक्रार जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, बीड यांना प्राप्त झालेली नाही.
(२) समाजसेवक श्री. नंदकिशोर मुंदडा यांनी शासकीय गोदामास भेट दिली त्यावेळी काही कट्ट्यात धान्य ४२ ते ४४ किलो असल्याचे नायब तहसिलदार पुरवठा व गोदाम रक्षक, अंबाजोगाई यांनी मान्य केले आहे.
(३) व (४) नायब तहसिलदार (पुरवठा) व गोदाम रक्षक, अंबाजोगाई यांनी कार्यालयीन शिस्तभंग केल्यामुळे त्यांचेविरूध्द शिस्तभंग कार्यवाहीबाबत सुधारित दोषारोप पत्र/जोडपत्र १ ते ४ तहसिलदार, अंबाजोगाई यांनी दि. २२ नोव्हेंबर, २०२१ रोजी सादर केले असून सदर दोषारोप पत्र/ जोडपत्र १ ते ४ जिल्हाधिकारी, बीड यांना दि. २८ जानेवारी, २०२२ रोजी सादर करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील ग्रंथालयांच्या अनुदानाबाबत**

**(३३) ३५२१३ (१२-०१-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रंथालयांना अ,ब,क,ड वर्गवारीनुसार दरवर्षी दोन टप्प्यात अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंगोली जिल्ह्यातील ग्रंथालयांना गतवर्षी मंजूर केलेले अनुदान अद्याप देण्यांत आले नसल्याचे तसेच सन २०१२ पासून ग्रंथालयाच्या श्रेणी बदलाची प्रक्रिया बंद करण्यांत आली असून त्याबाबतचे प्रस्ताव देखील स्विकारण्यांत येत नसल्याचे दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मंजुर झालेले अनुदान तातडीने देण्यांत यावे व सध्याच्या अनुदान रक्कमेत वाढ करण्यांत येऊन ग्रंथालय श्रेणी बदलाचे (वर्गवारी) प्रस्ताव देखील स्विकारण्यांत यावेत यासह अन्य मागण्यांबाबत ग्रंथालय संघटनेचे पदाधिकारी व लोकप्रतिनिधी यांनी नांदेड येथे उपोषण सुरु केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२४-०२-२०२२) :** (१) होय.
(२) हिंगोली जिल्ह्यातील ग्रंथालयांचे सन २०२०-२१ चे अनुदान थकीत होते.तसेच सन २०१२ पासून शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाची श्रेणी/ वर्गवाढ देणे बंद आहे .
(३) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचे सन २०२०-२१ मधील थकीत अनुदान वितरित न केल्यास दि.२०.०७.२०२१ पासून आमरण उपोषण करणेबाबत नांदेड जिल्हा ग्रंथालय संघाचे दि.१५ जूलै, २०२१ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे. ग्रंथालय संचालक यांनी त्यांच्या दि.१५ जूलै, २०२१ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार दि.२०.जूलै, २०२१ पासून सुरु होणारे उपोषण मागे घेण्यात आले आहे.

(४) मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या विविध मागण्यांसंदर्भात दि.१२.०२.२०२० रोजी बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीमध्ये नवीन सार्वजनिक ग्रंथालयांना मान्यता देण्यात येवू नये. शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या तपासण्या करुन गुणवत्तेनुसार अनुदान वाढीबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल. तसेच कार्यरत शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना दर्जा/ वर्गवाढ देण्यात येवू नये, असे निर्देश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शिक्षणाधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३४) ३५३३१ (१२-०१-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ३३ जिल्हा परिषदा व ४ महापालिकांमधील शिक्षणाधिकाऱ्यांच्या १४४ पदांपैकी ६१ पदे रिक्त असल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे व करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०४-०३-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) पदोन्नतीने रिक्त पदे भरण्याबाबतची आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील टॅक्सी चालकांचा कोरोना काळातील टॅक्स माफ करण्याबाबत**

**(३५) ३५३३३ (१२-०१-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोना व लॉकडाऊनच्या कठोर निर्बंधामुळे राज्यातील टॅक्सी चालकांचा व्यवसाय ठप्प झाल्यामुळे त्यांना शासनाकडे दरमहा टॅक्स भरणे अडचणीचे झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शासनाने निर्णय घेऊन या टॅक्सीचालकांचा टॅक्स माफ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. अनिल परब (०४-०३-२०२२) :** (१) व (२) दि.१५ सप्टेंबर, २०२० व दि. ३० सप्टेंबर, २०२० रोजीच्या अधिसूचनेद्वारे कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे लागू केलेल्या टाळेबंदीच्या अनुषंगाने वार्षिक कर भरणाऱ्या लोक सेवा वाहनांना, वाहन मालकाने मागील वर्षाचा वार्षिक कर दि. ३१.०३.२०२० रोजी किंवा त्यापूर्वी भरणा केला असेल या अटीच्या अधीन राहून दि. ०१ एप्रिल, २०२० ते दि. ३१ मार्च, २०२१ या कालावधीकरीता ५०% करमाफी दिली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील उद्योग क्षेत्राच्या गुंतवणूकीबाबत**

**(३६) ३५५१२ (१२-०१-२०२२). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सह्याद्री या शासकीय अतिथी गृह येथे उद्योग विभागाच्या वतीने २५ भारतीय कंपन्यांशी मा. मुख्यमंत्री व उद्योग मंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत सुमारे ६१ हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार दिनांक २१ डिसेंबर, २०२० अथवा त्या सुमारास करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोविड-१९ चे संकट असतानाही राज्याच्या उद्योग विभागाने कमी कालावधीत सुमारे २ लाख कोटी रुपयांचे उद्दीष्ट पुरे केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० अंतर्गत उद्योग कराराचा हा तिसरा टप्पा असून विशेष बाब म्हणजे करार करण्यात आलेल्या सर्व कंपन्या ह्या भारतातील आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर नव्या गुंतवणूकीतून साधारणतः किती तरुणांना रोजगार मिळणार आहे.
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (२४-०२-२०२२) :**(१) होय, हे खरे आहे.
सदरचे सामंजस्य करार दिनांक २२ डिसेंबर, २०२० रोजी करण्यात आले आहेत.
(२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) सदर गुंतवणुकीतून सुमारे २,५५,३८० इतका रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील प्रत्येक गांवात पाण्याची गुणवत्ता तपासणीसाठी महिलांना प्रशिक्षण देणेबाबत.**

**(३७) ३५८०१ (१२-०१-२०२२). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जल जीवन मिशन अंतर्गत राज्यातील ३४ जिल्ह्यांतील नागरीकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी दिनांक २ ऑक्टोबर, २०२१ रोजी ग्रामपंचायत, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या प्रस्तावित बैठकीत १८ मुद्द्यांवर चर्चा होणे अपेक्षित होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक गांवाचा ५ वर्षांसाठी गांव कृती आराखडा तयार करणे, प्रत्येक गांवातील सक्रिय ५ महिलांना पाणी गुणवत्ता तपासणीसाठी प्रशिक्षीत करणे इ. १८ बाबींची अंमलबजावणी करण्याच्या सुचना राज्य पाणी व स्वच्छता मिशनने जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त १८ बाबींपैकी किती व कुठल्या गोष्टींची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यात आली आहे तसेच याबाबत गांवातील महिलांना प्रशिक्षीत करण्यात आले, काय

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील (२३-०२-२०२२) :**(१) व (२) होय हे खरे आहे.

राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या दिनांक २४.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी दिनांक २ ऑक्टोबर,२०२१ रोजी ग्रामपंचायत, ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता समितीच्या बैठकीत चर्चा घडवून आणण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. यामध्ये, प्रत्येक गावातील सक्रिय ५ महिलांना पाणी गुणवत्ता तपासणीसाठी प्रशिक्षित करणे व इतर सर्व बाबींचा समावेश आहे.

(३) यातील, सर्वच बाबींची अंमलबजावणी जिल्हा परिषद स्तरावर करण्यात येत आहे. दि.१०.०२.२०२२ रोजीच्या IMIS Dashboard वरील स्थितीस अनुसरुन, राज्यातील ३९३४५ गावातील महिलांना प्रशिक्षिण देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरोळ (ता.जि. कोल्हापूर) येथील पंचगंगा नदीमध्ये रसायन मिश्रीत व दुषित पाणी सोडणाऱ्या कारखान्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत**

**(३८) ३५८१४ (१२-०१-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ (ता.जि. कोल्हापूर) येथील पंचगंगा नदीत रसायन मिश्रीत व दुषित पाणी सोडल्याने हजारो मासे मृत्यूमुखी पडले असून स्थानिक नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पंचगंगा नदीमध्ये रसायन मिश्रीत व दुषित पाणी सोडणाऱ्या कारखान्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (२५-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड थेरगाव शाळेतील शालेय पोषण**
**आहाराची देयके दोन वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत**

**(३९) ३५८५० (१२-०१-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मनपाच्या थेरगाव येथील माध्यमिक शाळेत शासन निर्णयानुसार शालेय पोषण आहार प्रतिभा महिला प्रतिष्ठान या बचत गटामार्फत पुरविण्यात येत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिला बचत गटाच्या शालेय पोषण आहाराचे सन २०१८-१९ मधील लाखो रुपयांची देयके निधी अभावी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०२-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

प्रस्तुत महिला बचत गटाचे रु.३५,७२३/- इतक्या रक्कमेचे देयके प्रलंबित आहे.

(३) व (४) संबंधित शाळांनी MDM पोर्टलवर भरलेल्या दैनंदिन उपस्थितीच्या आधारे देयके शाळांना अदा केली जातात. सदरप्रमाणे दैनंदिन उपस्थितीची संबंधित शाळेने माहिती भरली नसल्याने त्यांची देयके प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरुन अदा करण्यात आलेली नाहीत.

---

**मौजा जांब व सारंगपुरी, येथे औद्योगीक क्षेत्र स्थापन करण्याबाबत**

**(४०) ३५९९२ (१२-०१-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा जांब व सारंगपूरी, येथे औद्योगीक क्षेत्र स्थापन करण्याबाबत दि. २८ ऑगस्ट, २०१८ नुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग भवन यांनी शासनाकडे मंजुरी करिता प्रस्ताव सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथे १०६.०१ हे.आर. जमीन संपादीत करण्याकरिता उपलब्ध असून तेथील १ कि.मी. अंतराव सारंगपुरी तलावात पाण्याची सुध्दा उपलब्ध आहे तसेच या परिसराचे जवळून अप्पर वर्धा प्रकल्पाचे कॅनल असल्यामुळे पाण्याची उपलब्धता आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या परिसरातुन कोणतीही टॉवर लाईन तसेच कोणताही बायपास प्रस्तावित नाही तसेच कचरा डेपो हा नगर परिषद क्षेत्रात आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रस्तावाच्या मंजुरीस हेतुपुरस्पर व चुकीची माहीती पुरविल्या जात आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, नवीन औदयागिक क्षेत्र स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (२४-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही

(२) प्रश्न उद्भवत नाही

(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूनिवड समितीच्या अहवालानुसार प्रस्तावित जागेत कचरा विलगीकरण डेपो, टॉवर लाईन, तसेच बायपास रस्ता जात असल्याचे निदर्शनास येते.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यात कौशल्य विद्यापीठ मंजूरी देण्याबाबत**

**(४१) ३६०२९ (१२-०१-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांना कौशल्याच्या आधारीत शिक्षण मिळावे यासाठी कौशल्य विद्यापीठ मंजूर करुन अतिरिक्त ६ खाजगी कौशल्य विद्यापीठास शासनाने मंजूरी दिली असल्याचे माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५०० कोटीची आर्थिक तरतूद करुन दरवर्षी १०० कोटी रुपये देणार असल्याचे मा.कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता व नाविन्यता मंत्री यांनी दिनांक ६ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या सुमारास जाहीर केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच शासकीय विद्यापीठांवर कुलगुरु व कुलसचिव पदांची नियुक्ती करण्याबाबत माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान जाहिरात प्रसिध्द केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जाहिरातीनुसार एकूण पदनिहाय एकूण किती अर्ज प्राप्त झाले व त्यानुसार कुलगुरु पदासह या अर्जाची छाननी समितीने केली आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (२५-०२-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (सार्वजनिक अर्थसहाय्यित) स्थापनेबाबतचे विधेयक मंजूर झाल्यानंतर आणखी एका खाजगी (स्वयंअर्थसहाय्यित) कौशल्य विद्यापीठास मंजूरी देण्यात आली आहे.

(२) होय, हे अंशत खरे आहे.

दिनांक १७ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ स्थापनेनंतर कौशल्य विद्यापीठासाठी प्रशासन, इमारत इत्यादीकरीता शासनातर्फे प्रतिवर्षी सुमारे रु.५० कोटी इतका निधी पुढील १० वर्षे देण्याबाबतच्या प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्य विद्यापीठावर कुलगुरु व कुलसचिव पदांची नियुक्ती करण्यासाठी, शासन मान्यतेने जाहिरात दिनांक १४ मे, २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आली.

(४) जाहिरातीनुसार पदनिहाय, कुलगुरू पदासाठी ५९ व कुलसचिव पदासाठी ४५ असे एकूण १०४ अर्ज प्राप्त झाले. प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी, शासनाने नेमुन दिलेल्या तज्ञ समितीमार्फत दिनांक ९ ऑगस्ट, २०२१ व दिनांक २४ ऑगस्ट, २०२१ रोजी आयोजित बैठकीत करण्यात आली. सदर समितीमध्ये शिक्षण तज्ञ सदस्यांचा देखील समावेश करण्यात आला. सदर जाहिराताचे स्वरूप मोघम असल्यामुळे व अर्ज मागवितेवेळी पूर्वनिर्धारित निवड निकषांअभावी, उचित उमेदवाराची निवड करू शकत नसल्याचे मत तज्ञ सदस्यांनी व्यक्त केले. तसेच सदर अधिकार शासनाचे असल्यामुळे, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियमातील कलम ८१ प्रमाणे शासन स्तरावर कार्यवाही करावी, असे अभिप्राय शासनास सादर करण्यात आले आहेत.

(५) महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियमातील कलम ८१ मधील तरतूदीस अनुसरुन विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु व प्रथम कुलसचिव यांची नियुक्ती करण्याचे अधिकार शासनास असल्यामुळे सदर पदांवरील नियुक्ती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अकोला (जि.अकोला) विभागात सरळ सेवा भरती प्रक्रीयेतील अनियमिततेबाबत**

**(४२) ३६२३९ (२९-११-२०२१). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) विभागातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सरळ सेवा भरती प्रक्रीया सन २०१७ करीता जाहीरात क्र. २/२०१७ प्रसारीत करुन या भरती प्रक्रीयेनुसार सहाय्यक पदासाठी इतर मागास प्रवर्गामध्ये १९ उमेदवारांची अंतीम निवड यादी प्रसारीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जाहीर केलेल्या निवड यादीमधील प्रथम क्रमांकावर असलेल्या तसेच केंद्रीय कार्यालयाकडून पात्र ठरवून क्षेत्रीय स्तरावर नियुक्तीची कार्यवाही करण्याचे आदेश असतांना सुध्दा विभाग नियंत्रक यांनी नियमबाह्यरित्या इतर विभागातून बदली झालेल्या कर्मचा-यांना सामावून सदर जागी नियुक्ती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२०-१२-२०२१) :** (१) होय.

(२) राज्य परिवहन महामंडळाच्या नियोजन खात्याचे परिपत्रक क्र.०१/२०१९ अन्वये सहाय्यक प्रवर्गाची मंजूरी सुधारीत करण्यात आल्याने, अकोला विभागाची सहाय्यक पदाची मंजूरी २६० वरुन २२४ इतकी झाली आहे. तसेच, सदर जाहिरात प्रसिध्द केल्यानंतर सन २०१७ नंतर अकोला विभागामध्ये इतर विभागातून इतर मागास वर्ग प्रवर्गाचे एकूण १० सहाय्यक पदातील

विनंतीवरुन बदलून आलेल्या कर्मचाऱ्यांना हजर करुन घेण्यात आले आहे. त्यामुळे इतर मागास वर्ग प्रवर्गाच्या जागा रिक्त नसल्यामुळे सरळसेवा भरती अंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना नेमणूक देता आलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर येथील वस्त्रनिर्माण पदविका अभ्यासक्रम बंद करण्यात आल्याबाबत**

**(४३) ३६३६५ (१२-०१-२०२२). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य)** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर मधील वस्त्रनिर्माण हा अभ्यासक्रम बंद करण्यात येत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वस्त्रोद्योगाची व्याप्ती पाहता या अभ्यासक्रमाची योग्य तरी प्रसिध्दी करुन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी पत्र देवून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी या मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२३-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय,

लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०६ जानेवारी, २०२० रोजीचे पत्रान्वये मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचेकडे शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर हे तंत्रनिकेतन बंद न करता या संस्थेच्या आवारात उपलब्ध असलेल्या ३२ एकर जागेत नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याबाबतची मागणी केलेली आहे.
(३) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी दिनांक ५ मार्च, २०२० रोजीच्या बैठकीत दिलेल्या निदेशानुसार शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर या संस्थेतील वस्त्रनिर्माण पदविका हा अभ्यासक्रम बंद करून संस्थेच्या विभागात स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावर अल्पकालावधीचे गारमेंट मॅन्युफॅक्चरिंग आणि पॉवरलुम विवींग हे दोन कौशल्य विकास अभ्यासक्रम, स्थानिक औद्योगिक क्षेत्राकडून तांत्रिक सहकार्य घेवून तसेच सी.एस.आर. अंतर्गत आवश्यक अर्थसहाय्य प्राप्त करुन घेऊन व स्थानिक उद्योगांसाठी कुशल मनुष्यबळाची गरज विचारात घेऊन सुरू करण्याबाबतची कार्यवाही तंत्रशिक्षण संचालनालयाकडून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पालघर येथे मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र उभारण्याबाबत

**(४४) ३६६१३ (१२-०१-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोयीसुविधा जिल्हयातच प्राप्त व्हाव्यात या उद्देशाने पालघर येथे मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उपकेंद्राच्या जमिनीच्या प्रस्तावास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उपकेंद्र उभारण्यासाठी अजून किती कालावधी अपेक्षित आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०३-०३-२०२२) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत पालघर जिल्हयामध्ये विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करण्याबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करण्याकरीता त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेल्या प्रस्तावास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्याची बाब विद्यापीठ स्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### औरंगाबाद व नागपूर येथील राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या न्यायिक सदस्यांची तात्काळ नियुक्ती करण्याबाबत

**(४५) ३६७५४ (१२-०१-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद व नागपूर येथील राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या न्यायिक सदस्यांची अद्यापपर्यंत शासनाकडून नेमणूक न करण्यात आल्याने आयोगाचे कामकाज ठप्प होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने औरंगाबाद व नागपूर येथील राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या न्यायिक सदस्यांची तात्काळ नियुक्ती करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ (१४-०२-२०२२) :** (१) व (२) राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या, प्रादेशिक खंडपीठ औरंगाबाद व नागपूर येथे प्रत्येकी २ गैरन्यायिक व १ न्यायिक सदस्यांची पदे मंजूर आहे. सद्य:स्थितीत न्यायिक सदस्यांची पदे कार्यरत आहेत. नागपूर येथील २ व औरंगाबाद येथील १ अशी एकूण ३ गैरन्यायिक सदस्यांची पदे रिक्त आहेत.

राज्य आयोगातील ८ व जिल्हा आयोगातील २५ अध्यक्ष व सदस्य यांची रिक्त असलेली एकूण ३३ पदे भरण्यासाठी राज्य शासनाने सन २०२१ मध्ये पद भरती प्रक्रिया राबविली होती. त्यामध्ये औरंगाबाद व नागपूर खंडपीठातील रिक्त पदांचा देखिल समावेश होता. तथापि, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.१०९६/२०२१ व जनहित याचिका क्र.११/२०२१ मधील दि.१४.०९.२०२१ च्या आदेशान्वये सदरची प्रक्रिया केंद्र शासनाचे नियमातील तरतुदी अवैध ठरवून रद्द केलेली आहे. या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात केंद्र शासनाने तसेच राज्य शासनाने विशेष अनुमती याचिका दाखल केल्या असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या परभणी येथील बसस्थानकाचे अद्यावत बसपोर्टमध्ये रुपांतर करण्याबाबत**

**(४६) ३६८४७ (१२-०१-२०२२). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या परभणी येथील बसस्थानकाचे रुपांतर अद्ययावत अशा बसपोर्टमध्ये करण्यासाठी सन २०१८ मध्ये शासनाने १३ कोटी ४ लाख ४८ हजार ६०० रुपयांचा निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८ मध्ये या कामाचे भूमिपुजन होऊनही अद्यापपर्यंत सदर बसपोर्टचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१६-०२-२०२२) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) परभणी बसस्थानकाचे पुनर्बांधणीचे काम हाती घेण्यापूर्वी वाहतूकीसाठी प्रवाशांच्या सोयीकरीता प्रथम तात्पुरत्या स्वरुपाचे बसस्थानक शेड उभारण्यात आले. तद्नंतर जुन्या बसस्थानकाचे तोडकाम करतेवेळी बसस्थानकातील उपहारगृह परवाना धारकाने जागा रिक्त न करता सदर प्रकरण न्याय प्रविष्ट केले. सदर प्रकरणाचा निकाल माहे महामंडळाच्या बाजूने लागला. कोविड-१९ महामारीमुळे शासनाने २२ मार्च २०२० पासून राज्यभर टाळेबंदी घोषीत केल्याने महामंडळाची वाहतूक बंद ठेवावी लागली. रा.प. महामंडळाची आर्थिक परिस्थिती खालावल्याने ठेकेदाराने केलेल्या कामाची देयके वेळेत अदा करणे शक्य झाले नाही सद्यस्थितीत बसस्थानक इमारतीचे काम प्रगतीपथावर असून जोत्यापर्यंत काम पुर्ण झाले आहे.

---

**डोंबिवली येथील औद्योगिक विकास महामंडळा अंतर्गत कर्मचाऱ्यांना औद्योगिक क्षेत्रामध्ये देण्यात येणाऱ्या सदनिकेत झालेला गैरव्यवहार**

**(४७) ३६९१२ (१२-०१-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाअंतर्गत कर्मचाऱ्यांना औद्योगिक क्षेत्रामध्ये सदनिका देण्यात येणाऱ्या धोरणाच्या अनुषंगाने श्री. प्रकाश चव्हाण, अधीक्षक अभियंता यांना डोंबिवली एम.आय.डी.सी. क्षेत्रात फ्लॅट वितरीत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, श्री. प्रकाश चव्हाण अधीक्षक अभियंता यांना पहिला फ्लॅट वितरीत केला असताना दुसऱ्या फ्लॅटचे वितरण झाले असून त्यांनी प्रथम फ्लॅटची विक्री करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री. प्रकाश चव्हाण यांनी एम.आय.डी.सी. चा फ्लॅट वितरणाचा दोन वेळा लाभ घेण्याचा प्रयत्न केला असून त्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी तक्रार करून देखील अद्यापपर्यंत चुकीचे वाटप रद्द करण्यात आलेले नाही, हे हि खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने संबधित अधीक्षक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२४-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) व (४) श्री.प्रकाश चव्हाण, अधिक्षक अभियंता यांना सन १९९८-१९९९ मध्ये वाटप करण्यात आलेला फ्लॅट त्यांनी सन २०१४ मध्ये विकला असून म.औ.वि.महामंडळाने दि.१२.०३.२०२१ रोजी उपलब्ध करून दिलेल्या निवासी भूखंडावर (क्र.आर-४६) उभारण्यात येणाऱ्या नियोजित गृहनिर्माण संस्थेमध्ये सभासदत्व देण्यात आले होते.

ठाणे औद्योगिक क्षेत्रात निवासी विभागातील भूखंड क्र.आर-४५ व आर-४६ या भूखंडांचे वाटप गृहनिर्माण सोसायटीस दि.१२.०३.२०२१ रोजी करण्यात आले असून त्यामध्ये ७९ सदस्य आहेत.निवासी भूखंड क्र.आर-४६ मध्ये सदनिका वाटपाच्या अनुषंगाने श्री.प्रकाश चव्हाण यांनी सभासद म्हणून नाव नोंदविण्यात आले होते.तथापि वैयक्तीक कारणास्तव त्यांनी सोसायटीमधील सभासदत्वाचा दि.२०.११. २०२१ रोजी राजीनामा दिला असून दि.२२.१२.२०२१ रोजीच्या सोसायटीच्या सभेत तो मंजूर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## रांजणगाव देशमुख (ता.कोपरगाव, जि.अहमदनगर) प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या दुरुस्ती व अस्तरीकरणाच्या कामांसाठी निधी मिळण्याबाबत

**(४८) ३७५७५ (१२-०१-२०२२). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रांजणगाव देशमुख (ता.कोपरगाव, जि.अहमदनगर) प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे दुरुस्ती व अस्तरीकरणाचे काम निधी अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील (२८-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) साठवण तलावातील फाटलेल्या अस्तरीकरणाच्या दुरुस्तीसह पंपिंग मशिनरी, विविध पाईपलाइनच्या दुरुस्त्या, उंच टाक्या व जलशुध्दीकरण केंद्राच्या दुरुस्तीसह थकित विद्युत देयके, जलसंपदा खात्याची थकित देयके इ. चा समावेश असलेले रु. १५०.८३ लक्ष (ढोबळ) किंमतीचे अंदाजपत्रक निधी उपलब्धतेसाठी जिल्हा नियोजन मंडळाकडे सादर होणेकरिता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, कोपरगाव यांचेकडे सादर करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धारणगाव पाणीपुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत

**(४९) ३७५७६ (१२-०१-२०२२). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारणगाव (ता.कोपरगाव, जि.अहमदनगर) पाणीपुरवठा योजनंची कामे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजनेला सुधारित प्रशासकीय मान्यता मिळावी यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर योजनेला सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१६-०२-२०२२) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

सदर योजनेचा रु. ६७७.४९ लक्ष ढोबळ किंमतीचा पुनर्सुधारित योजनेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. शासनाने दिनांक ०४.०९.२०२० रोजी जल जीवन मिशनबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या असून सदरची योजना आहे त्या स्थितीत अंतिम (Fore Closer) करुन जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत रेट्रोफिटींग अंतर्गत अस्तित्वातील उपांगाचा वापर करुन प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाकडी (ता.कोपरगांव, जि.अहमदनगर) येथे नवीन साठवण तलावासाठी कृषी महामंडळाची जमीन देण्याबाबत**

**(५०) ३७५७७ (१२-०१-२०२२). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाकडी (ता.कोपरगांव, जि.अहमदनगर) गावातील लोकसंख्येच्या प्रमाणात नागरिकांना पाणीपुरवठा करणाऱ्या साठवण तलावातील पाणीसाठा कमी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे वाकड गावात पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी नवीन साठवण तलावासाठी कृषी महामंडळाची ४ हेक्टर ८८ आर जमीन वाकडी ग्रामपंचायतीला विनामुल्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (११-०२-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत वाकडी गावासाठी नवीन पाणी पुरवठा योजना प्रस्तावित करण्यात आलेली आहे. सदर योजनेसाठी गोदावरी उजवा कालवा उद्भव गृहीत धरण्यात आलेला आहे. योजनेत समाविष्ट साठवण तलावासाठी लागणारी जागा (४ हेक्टर ८८ आर) शेती महामंडळाच्या मालकीची असून सदरची जागा मिळणेबाबत ग्रामपंचायत वाकडी यांचेमार्फत शेती महामंडळाकडे मागणी करण्यात आलेली आहे. शेती महामंडळाची जागा उपलब्ध करून घेणेसाठी जिल्हास्तरावरील आवश्यक विविध विभागांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. सर्व दस्तऐवज प्राप्त होताच सविस्तर प्रस्ताव संबंधित विभागाकडे सादर करण्याची तजवीज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.